N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** भंडारा **P.S.(ठाणे):** लाखांदुर **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0035 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/02/2021 19:06 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 08/02/2021
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/02/2021
**Time From (वेळेपासून):** 12:47 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:07 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 10/02/2021 **Time (वेळ):** 08:30 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 035 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/02/2021 18:57 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय लाखांदुर, लाखांदुर,लाखांदुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजेश काशिराम बांडे

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** काशिराम बांडे

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

नक्कल तोंडी फिर्याद पोलीस स्टेशन लाखांदुर दिनांक:—१०/०२/२०२१मी राजेश काशीराम बांडे, वय ३७ वर्षे, धंदा— शेती व धानव्यापार, रा. बोथली, ता. लाखांदुर, जिल्हा भंडारा मो.क्र. ८४५९४०७९६१ मी दिनांक ०८/०२/२०२१ रोजी पोलीस निरीक्षक श्री. योगेश्वर पारधी ला. प्र. वि. भंडारा यांचे कडे श्री. उईके साहेब तहसिलदार, तहसिल कार्यालय लाखांदुर यांनी लाच मागणी संबधाने तोंडी तक्रार नोंदविली. मी नोंदविलेली तोंडी तक्रार खालील प्रमाणे आहे.

"मी आज दिनांक ०८/०२/२०२१ रोजी समक्ष अॅन्टी करप्शन ब्युरो भंडारा येथे येवुन तोंडी रिपोर्ट देतो की, वर नमुद पत्यावर राहतो व शेती, धान्य खरेदी विक्री व रेती चा व्यवसाय करतो. माझ्याकडे दोन ट्रॅक्टर आहेत. सध्या रेती घाट बंद असल्यामुळे मी गावातील घरकुलाकरीता नदी पत्रातुन रेती उचलुन संबधीत ग्राहकांना देण्याचे काम करतो.दिनांक ०२/०२/२०२१ रोजी सकाळी ०६:०० वाजता सुमारास माझा ट्रॅक्टर क्र. एम.एच. ३३/एफ २२८० या ट्रॅक्टरचा चालक आकाश बाळु कुथे हा धर्मापुरी गावाजवळील चुलबंद नदी पत्रातुन रेती आनण्यासाठी जात असतांना लांखादुर तालुक्याचे तहसिलदार श्री. उईके साहेब यांनी माझा ट्रॅक्टर पकडला व पोलीस स्टेशन दिघोरी येथे लावुन माझ्यावर गुन्हा दाखल केला. याबाबत मी श्री. उईके साहेबांना दिनांक ०५/०२/२०२१ रोजी तहसील कार्यालय लाखांदुर येथे जावुन भेटलो तेव्हा ते मला म्हणाले की तु रेती चोरीचा धंदा करतेस, तुला रेती चोरी सुरू ठेवायची असेल तर तु मला दर महीन्याला १०,०००/— रूपये देत जा, मी तुझ्या ट्रॅक्टरवर कारवाई करणार नाही तु जर मला मंथली दिली नाहीस तर तुझ्या ट्रॅक्टरवर पुन्हा कारवाई करीन असे म्हणुन मला १०,०००/— रूपये लाचेची मागणी केली.मला उईके साहेब तहसिलदार, तहसिल कार्यालय लांखादुर यांना १०,०००/— लाच दयावयाची मुळीच ईच्छा नाही. यापुर्वी माझे त्यांचेशी पुर्वीचे कोणतेही आर्थिक देवाण—घेवाणीचे व्यवहार किंवा वैमनस्य नाही. करीता त्यांचेवर कायदेशिर कार्यवाही होणेकरीता मी अॅन्टी करप्शन ब्युरो भंडारा येथे येवून तोंडी तक्रार देत आहे." अशी तक्रार दिली होती.पोलीस निरीक्षक श्री. पारधी यांनी लाचेच्या संबंधाने पडताळणी व सापळा कार्यवाही आयोजित करण्यासाठी दोन शासकीय पंचाना बोलावून घेवून त्यांना मी दिलेली तोंडी तक्रार संगणकावर टंकलिखित करून, त्यांची प्रिंट काढुण, ती वाचण्याकरीता मला व दोन्ही दिली.मी व पंचांनी तोंडी तक्रार वाचुन बरोबर असल्याची खात्री करून त्याचेवर सहया केल्या. त्यांनतर पोलीस निरीक्षक श्री. पारधी, दोन पंच, सोबत एक अॅन्टी करप्शन येथील कर्मचारी व्हॉईस रेकॉर्डर व एक लॅपटॉप सह माझ्या कडील चारचाकी गाडीने वडसा रोडवरील चप्राड परिसरात गेलो. त्यानंतर मला आणि पंचाना मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता सुचना दिल्या. त्यांनतर पडताळणी करीता मी व पंच मांढरे यांचे सह उईके तहसीलदार यांना भेटण्याकरीता तहसील कार्यालय लांखादुर येथे व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझ्या गळयात लटकवुन दिल्यानंतर माझ्या चारचाकी गाडीने. तहसील कार्यालय लांखादुर येथे गेलो असता श्री. उईक साहेब हे त्यांचे ऑफिसमध्ये हजर होते. मी व पंच क्र. १ यांचेसह त्यांचे ऑफिस मध्ये जावून माझ्या आपल्या कामाबाबत बोलणी केली तेव्हा उईके साहेब तहसीलदार यांनीा मला **"मला माझे ट्रॅक्टरने रेती वाहतुक चालु ठेवण्याकरीता व ट्रॅक्टरवर कोणत्याच प्रकारची कार्यवाही न करण्यासाठी मासीक हप्ता म्हणुन दोन्ही हात वर करून दोन्ही हाताच्या दहा बोंटानी इशारा करून लाच म्हणुन १०,०००/— रूपये" लाचेची मागणी केल्याने मी** वडसा रोडवरील चप्राड परिसरात पंच क्र १ याचे सह परत आलो. मी पंचासह परत आल्यावर अे.सी. बी. येथील अधिकारी यांनी माझ्या गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढुन त्यामधिल रेकॉर्ड झालेले संभाषन ऐकुण लाचेची मागणी झाली असल्याची शहानिशा केली. त्यानंतर आम्ही अॅन्टी करप्शन ब्युरो भंडारा येथे माझ्या कडील चारचाकी वाहनाने परत आलो. त्यांनतंर श्री पारधी साहेब यांनी मला लाच रक्कम १०,०००/— रूपये हजर करण्यास सांगितले असता मी त्यांना माझ्याकडील असलेल्या १०,०००/— रूपये ज्यात ५००/— रूपयाच्या २० नोटा दोन्ही पंचासमक्ष श्री. पारधी साहेब यांचेकडे दिले. मी दिलेल्या नोंटावर पावडर लावून, एका लॅम्प चे उजेडात निळसर रंगाची चकाकी दिसत असल्याचे, प्रात्यक्षिक करून दाखविले व मला योग्यत्या सुचना देवून पुढील सापळा कार्यवाही ही दिनांक ०९/०२/२०२१ रोजी सकाळी करायची आहे असे सांगीतले. आज दिनांक ०९/०२/२०२१ रोजी पोलीस निरीक्षक श्री. पारधी साहेब, श्री. अहेरकर साहेब, दोन पंच, सापळा कार्यवाही स्टॉप सह हजर होते. पोलीस निरीक्षक श्री. पारधी यांनी दिनांक ०८/०२/२०२१ रोजी दिलेल्या सुचनांप्रमाणे वडसा रोडवरील चप्राड परीसरात माझ्या कडील मोटार सायकलसह

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बोथली,लाखांदुर,दिघोरी,भंडारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बोथली,लाखांदुर,दिघोरी,भंडारा,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):** व्यापारी

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8459407961

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | निवत्ती जगन उईके | | | 1. शिवनगर,लाखनी,लाखनी,लाखनी, भंडारा,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

प्रकरण अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता.वेळी व ठीकाणी यातील फीर्यादी/तक्रारदार यांना ट्रॅक्टरने रेती वाहतुक चालु ठेवण्याकरीता व ट्रॅक्टरवर कोणत्याही प्रकारची कारवाई न करण्याकरीता यातील आरोपी यांनी आपल्या पदाचा दुरूपयोग करून व वाम व भ्रष्ट मार्गाचा अवलंब करून मासिक हप्ता म्हणुन दोन्ही हात वर करून दोन्ही हाताच्या दहा बोटांनी पंच क्र.1 यांचेसमक्ष ईशारा करून लाचेची मागणी केल्याचे पडताळणी कार्यवाहीदरम्यान निष्पन्न झाल्याने आरोपीविरूध्द गुन्हा नोंद.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** MANOHAR HIRALAL KORETI(I (Inspector)) / **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

हजर झालो. काही वेळाने सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. पारधी यांनी वडसा रोडवरील चप्राड परिसरातुन सापळा कार्यवाही करीत असतांना माझ्या गळयात व्हाईस रेकॉर्डर लटकवुन पावडर लावलेल्या १०,०००/- रूपये माझ्या जिन्स पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात पंच क्र. २ श्री. वानखेडे यांचे हस्ते ठेवली.त्यानंतर लाच रक्कम देण्याकरीता पंच क्र. १ मांढरे यांचे सोबत माझे मो.सा. ने जाण्यास सांगीतले व माझ्या मागोमाग सापळा कार्यवाहीचे अधिकारी व कर्मचारी आले. त्यानंतर मि गै.अ. उईके,यांचे तहसील कार्यालयात गेलो तेव्हा श्री. उईके हे आपल्या ऑफिसमध्ये हजर होते. गै.अ. उईके यांचे ऑफिसमध्ये मिटींग सुरू असल्याने मी गै.अ. यांचे ऑफिसचे बाहेर उभा होतो. काही वेळाने मिटींग संपल्यावर मी गै. अ. यांचे ऑफिसमध्ये गेलो असता गै.अ. यांनी मला तुझा कामच नाही माझ्या जवळ, तुझा काम पोलीस स्टेशनला आहे. जा तु असे बोलुन गै.अ. उईके यांनी त्यांचे ऑफिसचे बाहेर जाण्यास सांगीतले.म्हणुन मी कोणताही इशारा न करता गै. अ. उईके यांचे ऑफिसमधुन निघुन मी वडसा रोडवरील चप्राड परिसरात परत आलो. त्यानंतर अे.सी.बी.चे लोंकानी माझ्या गळयातुन व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. व माझ्या खिशातील १०,०००/- रूपये लाच रक्कम पंच क्र. २ यांचे हस्ते बाहेर काढुन सापळा बॅग मध्ये ठेवले. मी श्री. पारधी साहेब यांना सांगीतले की, गै.अ. उईके यांना माझ्यावर संशय आला असेल म्हणुन त्यांनी माझे कडुन लाच रक्कम स्विकारली नाही. व यापुढे लाच रक्कम ते घेणार सुध्दा नाही असे सांगीतल्यावर श्री. पारधी साहेब यांनी आपली कार्यवाही पुर्ण केली व पुढील कारवाई दिनांक १०/०२/२०२१ रोजी करण्याचे ठरविले. मला माझे ट्रॅक्टरने रेती वाहतुक चालु ठेवण्याकरीता व ट्रॅक्टरवर कोणत्याच प्रकारची कार्यवाही न करण्यासाठी दिनांक ०८/०२/२०२१ रोजी १२:४७ वा. ते १४:०७ वा. दरम्यान पडताळणी कार्यवाही दरम्यान मासीक हप्ता म्हणुन दोन्ही हात वर करून दोन्ही हाताच्या दहा बोंटानी इशारा करून लाच म्हणुन १०,०००/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने श्री. उईके, तहसिलदार, तहसिल कार्यालय लाखांदुर यांचे विरूध्द कार्यवाहीस्तव: मी फियार्द देत आहे. हिच माझी फिर्याद आहे. माझी वरिल फिर्याद प्रिंट काढुन मला वाचण्यास दिली असुन, ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर संगणकावर टंकलिखीत करण्यात आली आहे. त्यावर मी सही केली. न.द. इग्रजीत अस्पष्ट नाव राजेश काशीराम बांडे.

सदर फिर्यादीचे तक्रारीवरून अपक्र.३५/२०२१ कलम ७ भ्र.प्र.का. १९८८ अन्वये नोंद करून तपासास पो.नी योगेश्वर पारधी ला.प्र.वि.भंडारा यांचेकडे वर्ग केला.

न.फ. संबधीत अधिंना रवाना आहे.

पो.का /विलास अपीना मालेरो
ब.न. ९४ पो.स्टे लाखांदूर

ठाणे अंमलदार
पो.स्टे. लाखांदूर
जिल्हा भंडारा

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): MANOHAR HIRALAL KORETI

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

ठाणे अंमलदार
पो.स्टे. लाखांदूर
जिल्हा-भंडारा

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**